सकाळ दि 01/07/2023

# चोरीच्या अकरा मोबाइलसह आरोपीला केली अटक

सकाळ 01/07/2023

## वजिराबाद गुन्हे शाखेची कारवाई : एक लाखाचे मोबाइल जप्त

**नांदेड, ता. ३० (बातमीदार)** : शहरातील बसस्थानक व रेल्वेस्थानक परिसरामध्ये मोबाईल चोरीच्या घटना वाढल्या असून, आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव यांनी सर्व पोलिस ठाण्यांना दिल्या आहेत. त्यानुसार वजीराबाद गुन्हे शोध पथकाने बुधवारी (ता. २८) मोबाईल चोरट्यांना ११ मोबाईलसह अटक करून चोरीचे एक लाख १० हजार रुपयांचे मोबाईल जप्त केले आहेत.

आरोपींचा शोध घेत असताना वजिराबाद पोलिसांना माहिती मिळाली की, आरोपी चोरीचे मोबाईल घेऊन तेलंगणात जात आहे. त्यानुसार पोलिसांनी तेथे जाऊन राजू देवीदास वाघमारे (रा. बळीरामपूर) यास ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याच्या जवळील प्रवासी बॅगेमध्ये एक लाख दहा हजार रुपयांचे चोरीचे मोबाईल दिसून आले. त्याने मोबाईल चोरल्याचे कबुल केले आहे.

ही कारवाई वजिराबाद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे अधिकारी शिवराज जमदडे, दत्तराम जाधव, मनोज परदेशी, विजयकुमार नंदे, शेख ईम्रान, बालाजी कदम, रमेश सुर्यवंशी, व्यंकट गंगलुवार आदींनी केली आहे.

# चार गुन्ह्यात १० आरोपी अटक; तीन खंजर, एक गावठी पिस्टल, मोबाईल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन..

देशोन्नती 01/07/23




**नांदेड** ▪ शिवाजीनगर ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केलेल्या कारवाईत चार गुन्ह्यातील १० आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ३ खंजर, १ गावठी पिस्तूल व मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे.

बकरी ईद सणानिमीत्त पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांना वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अमलदार यांना वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे सकाळी ६ वाजता पासुन हद्दीत गुन्हेगार चॉच पेट्रोलींग करत असतांना फिर्यादी सिद्धांत ज्ञानेश्वर पवार (१९) टिळकनगर नांदेड यास तीन अज्ञात इसमांनी खंजर लावुन खंडणी मागुन मारहाण केली. यामध्ये त्याचा मोबाईल व नगदी २ हजार रूपये काढुन घेतल्याने याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याने तात्काळ सदर आरोपीतांचा शोध घेवुन आरोपी लयख शेख इस्माईल (१९) रा. कंधार, साहिल विजय उर्फ पंजाब राठोड (१९) रा.भावसारचौक नांदेड, प्रशिक केळकर (१९) रा. लेबरकॉलनी यांना अटक करून त्यांचेकडील मोबाईल व खंजर नगदी २ हजार रुपये जप्त केले. तसेच गावठी पिस्तूल असल्याची माहिती मिळाल्याने आरोपी जयकुमार उर्फ सोनू राउत (२२) रा. सुमेधनगर, नांदेड यास बाबानगर येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक गावठी पिस्तूल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

त्याचप्रमाणे अधिकच्या गोपनिय माहितीच्या आधारे जुने फायर स्टेशन जवळुन तिन इसम चेतन कांबळे (२९) रा. आंबेडकरनगर नांदेड, शिवराज दळवे (२८) रा. लक्ष्मी रेसीडेंसी कॅनॉल रोड तरोडा, नांदेड, अंशु कांबळे (१९) व्यवसाय बेरोजगार रा. आंबेडकरनगर नांदेड यांचेकडुन एक खंजर जप्त केले. तसेच गोकुळनगर पाण्याची टाकीजवळुन तीन इसम विवेक उर्फ विक्की सुर्यवंशी (१९) रा. त्रिरत्न बौध्द विहार जवळ आंबेडकरनगर नांदेड, कुणाल परमार (२७) रा. भगतसिंग रोड जुना मोंढा नांदेड व एक विधिसंघर्ष बालक यांना ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक खंजर जप्त करून गुन्हे दाखल केले. या पथकात उप विभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव, पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक मिलींद सोनकांबळे, अमलदार दिलीप राठोड, शेख इब्राहीम, रविशंकर बामणे, देवसिंग सिंगल, शेख अझहर, दत्ता वडजे, विष्णु डफडे यांनी चार्ली पथकातील अमलदार आकाश सावंत, सुरज काकडे, सायबरसेल येथील अमलदार ओढणे, सिटीकर यांचा समावेश होता.